**मेसर्स वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लिमिटेड, गट नं. 204, नाशिक मुंबई महामार्ग वाडीवऱ्हे, ता.इगतपुरी, जि. नाशिक 422403, महाराष्ट्र यांचे अस्तित्वात असलेली व प्रस्तावित विस्तारीकरण युनिटमध्ये बल्क ड्रग्ज् व ए.पी.आय. उत्पादन क्षमता वाढीबाबत 12.85 मॅट्रीक टन प्रति मास ते 34.868 मॅट्रीक टन प्रति मास इतकी उत्पादन क्षमता वाढीबाबत पर्यावरण विषयक दिनांक 28/6/2017 रोजी झालेल्या जनसुनावणींचा इतिवृत्तांत.**

---

मेसर्स वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लिमिटेड, गट नं. 204, नाशिक मुंबई महामार्ग वाडीवऱ्हे, ता.इगतपुरी, जि. नाशिक 422403, महाराष्ट्र यांचे अस्तित्वात असलेल्या व प्रस्तावित विस्तारीकरण युनिटमध्ये बल्क ड्रग्ज् व ए.पी.आय. उत्पादन क्षमता वाढीबाबत 12.85 मॅट्रीक टन प्रति मास ते 34.868 मॅट्रीक टन प्रति मास इतकी उत्पादन क्षमता वाढीबाबत पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी दिनांक 28/6/2017 रोजी वेळ सकाळी 11 वा. गट नं. 204, नाशिक मुंबई महामार्ग वाडीवऱ्हे, ता.इगतपुरी, जि. नाशिक 422403, महाराष्ट्र यांच्या परिसरात येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर सुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांचे कार्यालयीन आदेश क्र.ई-49 पत्र क्र. बीओ/जेडी(डब्ल्यूपीसी)/पीएच/बी-2482 दिनांक 22/06/2017 अन्वये सार्वजनिक सुनावणी पॅनेल निश्चित करुन आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशास अनुसरुन व्यासपीठावर सदर सुनावणीचे अध्यक्ष तथा माननीय अध्यक्ष यांनी नामनिर्देशित केलेले मा अतिरिक्त जिल्हाधिकारी नाशिक श्री. दिलीप स्वामी साहेब, सदर सुनावणीचे सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मं. नाशिक श्री. राजेंद्र पाटील, सदर सुनावणीचे समन्वयक तथा उप-प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मं.नाशिक श्री.कुडे उपस्थित होते.

सदर सुनावणीचे कामकाज मा.अध्यक्ष साहेब यांचे संमतीने सुरु करण्यात आले. सदर सुनावणीचे प्रास्ताविक श्री.निलेश मोराणकर, क्षेत्र अधिकारी, उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मं.नाशिक यांनी केले. त्यात त्यांनी पुढीलप्रमाणे माहिती थोडक्यात सादर केली.

सुस्वागतम् ! सुस्वागतम् !!

आजच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीचे अध्यक्ष तथा माननीय अतिरिक्त जिल्हाधिकारी नाशिक श्री. दिलीप स्वामी साहेब, पर्यावरण जाहीर सुनावणीचे सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी मा.श्री.राजेंद्र पाटील साहेब, पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीचे समन्वयक तथा उपप्रादेशिक अधिकारी श्री.कुडे साहेब, परिसरातील उपस्थित बंधु भगिनींनो व मेसर्स वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लि. चे अधिकारी व कर्मचारी वृंद यांचे स्वागत करुन.

पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीचे अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीचे कामकाज सुरु करण्यात आले.

मेसर्स वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लिमिटेड, यांच्या गट नं. 204, नाशिक मुंबई महामार्ग वाडीवऱ्हे, ता.इगतपुरी, जि. नाशिक 422403, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प १२.८५ मे. टन / प्रतिमास ते ३४.८६८ मे. टन / प्रतिमास क्षमतेच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक मंजुरीकरिता जनसुनावणी घेण्याकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अर्ज सादर करण्यात आला होता. भारत सरकारच्या पर्यावरण व वने, मंत्रालय, नवी दिल्लीचे दि. १४/०९/२००६ च्या अधिनियमान्वये व दि.०१/१२/२००९ च्या सुधारीत अधिनियमान्वये सदरील प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक परवानगी देण्याच्या दृष्टीने केंद्रीय पर्यावरण विभागाकडील अर्जाचे संदर्भात जन सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. सदर प्रकल्प विषयक जाहीर

जन सुनावणीची सुचना इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रात देण्यात आली होती. सदर प्रकल्पासंबंधीत पर्यावरण विषयक सुचना, विचार, टीका-टिप्पणी तसेच आक्षेप, जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्यावर नोंदविण्याचे नमूद केले होते. प्रादेशिक कार्यालय, उद्योग भवन, पहिला मजला, आय.टी.आय.सिग्नल जवळ, त्रिंबकरोड, एम.आय.डी.सी.कपांउण्ड, नाशिक ४२२००७ दुरध्वनी क्र. २३६५१५०, २३६५१६१ फॅक्स : २३६५१४०, ईमेल : sronashik@mcb.gov.in त्यास अनुसरुन दोन निवेदने प्राप्त झालेली आहेत. सदर जाहिरातीमध्ये सुनावणीची तारीख, वेळ व ठिकाण नमुद केलेले आहे.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्ताऐवज खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध होते व संबंधीत व्यक्तींना या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्ताऐवज अभ्यासू शकतील असे नमूद करण्यात आले होते.

१) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

२) सह संचालक (जल प्रदूषण निवारण) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, ३ रा आणि ४ था मजला, सिने प्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पु) मुंबई ४०० ०२२.

३) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, आय.टी.आय.सिग्नलजवळ, त्रिंबकरोड, एम.आय.डी.सी.कंपाउण्ड, सातपुर, नाशिक ४२२००७.

४) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, आय.टी.आय.सिग्नलजवळ, त्रिंबकरोड, एम.आय.डी.सी.कंपाउण्ड, सातपुर, नाशिक ४२२००७.

५) जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक ता.जि.नाशिक

६) जिल्हा परिषद, कार्यालय, नाशिक त्र्यंबकरोड, ता.जि.नाशिक

७) जिल्हा उद्योग केंद्र, त्रिंबकरोड, आय.टी.आय.जवळ, ता.जि.नाशिक

८) उपविभागीय कार्यालय, इगतपुरी, ता.इगतपुरी, जि. नाशिक

९) तहसिल कार्यालय, इगतपुरी, ता.इगतपुरी, जि. नाशिक

१०) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, दुसरा मजला, उद्योग भवन, आय.टी.आय.सिग्नलजवळ, त्रिंबकरोड, एम.आय.डी.सी.कंपाउण्ड, सातपुर, नाशिक ४२२००७.

११) मुख्य अधिकारी, नगर परिषद इगतपुरी, ता.इगतपुरी, जि. नाशिक

१२) परिसरातील २६ ग्रामपंचायत कार्यालये.

सदर सुनावणी सदर प्रकल्पा संदर्भातील पर्यावरण विषयक बाबींसाठी घेण्यात येणार असून सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरातील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्तापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी टीका – टिप्पणी किंवा आरोप तोंडी अथवा लेखी स्वरुपात नोंदविता येतील. सदर अहवाल शासनास सी.डी.सह सादर केला जाईल. प्रकल्पधारकांना मा.अध्यक्ष, महोदय साहेब यांच्या परवानगीने सादरीकरणासाठी विनंती करण्यात आली.

मे.वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स तर्फे प्रकल्पा संबंधीत व प्रकल्पाच्या पर्यावरण आघात अभ्यासासंदर्भात सादरीकरण करण्यात आले.

मा.श्री. वसंत जगताप साहेब, संचालक, मे. वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लिमिटेड, गट नं. 204, नाशिक मुंबई महामार्ग वाडीवऱ्हे, ता.इगतपुरी, जि. नाशिक 422403, महाराष्ट्र यांनी उपस्थितांचे स्वागत केले व आपले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी नमूद केले की, मी वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् तर्फे आलेले सगळे ग्रामस्थ यांचे स्वागत करतो. त्याचबरोबर अध्यक्ष महोदय माननीय अतिरिक्त जिल्हाधिकारी, श्री.दिलीप स्वामी, मा. प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ श्री. राजेंद्र उ. पाटील, श्री.कुडे आणि जमलेले सगळे ग्रामस्थ वाडीवऱ्हे आणि गोंदे आणि पंचक्रोशीतले सगळे शैक्षणिक क्षेत्रातील, सामाजिक क्षेत्रातील अधिकारी वर्ग यांचे मी आज स्वागत करतो. आपण येथे पर्यावरणाविषयी जाहीर आज सुनावणी घेतोय. सगळयांना या विषयी बोलायचे आहे आणि संगळयांनी आपले जे काही प्रश्न असतील सांगायचे आहेत. त्याप्रमाणेच मी मे. वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लिमिटेड ही आपल्या वाडीवऱ्हे गावावरुनच नाव दिलेले आहे कंपनीचे. हा एक पहिला मुद्दा हा की गावाचे नाव पुढे गेले पाहिजे. पूर्ण जगात त्याचे नाव झालेले पाहिजे. म्हणून हा एक आपण मुद्दा घेतलेला आहे. की वाडीवऱ्हे हे नाव या कंपनीला दिले गेले आहे. दुसरे की, आपण इथे नवीन प्रॉडक्शन तयार करणार आहे. की जे प्रॉडक्शन पुढे आपल्या सगळ्या लोकांना त्याचा फायदा होणार आहे. स्पेशालिटी ॲण्टी कॅन्सर किंवा डायबेटीज मधुमेह इत्यादी रोगांसाठीच्या औषधीचे रॉ मटेरियल आपण येथे तयार करणार आहेत. त्याचप्रमाणे जे मायग्रेन अर्ध शिशी ज्यांचे डोकं दुखतं त्यांच्यावरचे काही आपण प्रॉडक्टसचे उत्पादन करणार आहेत. ही नवीन प्रॉडक्शन आपण चालू करणार आहोत आणि त्याविषयी ही आपण छोटीशी सभा आयोजित केलेली आहे. आणि पुन्हा आपण इथं सगळयाचं स्वागत करतो आणि साहेबांना येथे विनंती करतो की, प्रकल्प हा जो आहे की आपण आता अस्तित्वात असलेले काही प्रॉडकट जे आहेत आणि ॲडीशनल आपण काही घेणार आहोत याचं संपूर्ण आपण जे नवीन घेणार आहोत त्याबाबतीत आपण ही सुनावणी घेत आहोत. आणि त्याविषयीचा प्रस्तावित प्रकल्प हा 3 कोटी खर्चाचा आहे. आणि त्या 3 कोटी टोटल खर्च होणार

आहे आणि त्याच्यात आपल्याला काही लोकांना नोकरीच्या ही संधी मिळणार आहे आणि आपल्याला या कंपनीचे नांव पूर्ण जगात, प्रॉडक्शन जाईल तेव्हाच ना ? नांव होणार आहे. आणि ओव्हरऑल याच एक हे आहे.

वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लिमिटेड या कंपनीचे पर्यावरण विषयक सल्लागाराचे प्रतिनिधी श्री. प्रदीप जोशी यांनी सदर प्रकल्पाच्या अस्तित्वात असलेल्या व प्रस्तावित विस्तारीकरण युनिटमध्ये बल्क ड्रग्ज् व ए.पी.आय. उत्पादन क्षमता वाढविणेबाबत पर्यावरण संबंधीत मुदयांवर प्रेझेंटेशनव्दारे / तक्ते / नकाशे इ. सह सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे सादर केली.

नमस्कार, सगळ्या ग्रामस्थांचं आणि येथे आलेल्या ग्रामस्थाचं तसच आपल्या दुसऱ्या माणसाचं पण स्वागत येथे आहे. साहेबांचं दिलीप स्वामी साहेब तसचं कुडे साहेब, डायस वरती जे आपले आलेले पाहुणे आहेत. त्यांचेही स्वागत या कार्यक्रमामध्ये यह प्रोग्रॅम कुछ मराठी में होता है, इसलिए शायद आपको कही प्रॉब्लेम कुछ लोगों को कुछ नही अगर समझ में आया तो उनके लिए मैं आपको हिंदी में आप कभी भी मुझे पुछ सकते है उसका भी मैं जवाब दे दुंगा हा प्रकल्प जो आहे, हा आता अस्तित्वात असलेला आहे. आणि यांच्यामध्ये आपण पुढे जावून माझं नांव प्रदीप जोशी - मी कंपनी मे. ग्रीन सर्कल इनकार्पोरेटेड या कंपनीकडून आलेलो आहे. आणि आम्ही कंपनीचे एनव्हायरमेंट कन्सल्टंट आहोत आणि आम्हाला 2001 नंतर एन.ए.बी.एल. ही लॅबोरेटरी जी टेस्टींगची आहे. त्यांच्यामध्ये आय.एस.ओ. सर्टिफिकेशन आम्ही मिळविलेले आहेत. आणि आम्हाला एन.ए.बी.एल. ही मिळालेले आहे. आपण आता जे विचार करतोय किंवा आपण जे आता याच्याबद्दलची प्रस्तावना जी आपण देतोय त्याच्यामध्ये प्रस्तावना ही प्रकल्पा विषयीची जी माहिती आहे, त्यांच्यामध्ये वैशिष्टये येतील त्यांच्यामध्ये. मे.ग्रीन सर्कल इनकॉर्पोरेटेड यांचेतर्फे सदर प्रकल्पाच्या अस्तित्वात असलेल्या व प्रस्तावित विस्तारीकरणाचा पर्यावरण आघात विषयक बाबींचा सखोल अभ्यास केला आहे.

पर्यावरण म्हणजे - ज्याला आपण इनव्हॅर्मेंट म्हणतो त्याचे आम्ही मॅनेजमेंट कसे केले आहे त्याच्यावरती येईल. संभावित पर्यावरणावर परिणाम म्हणजे इनव्हॅर्मेंट इम्पॅक्ट काय होईल मॅनेजमेंट प्रोग्रॅम काय केला आहे ते येतील. त्यांच्यानंतर पावसाच्या पाण्याचे नियोजन आम्ही कसे केलेले आहे, रेन वॉटर व्हास्वेटींग वगैरे यांच्याबद्दलचं येईल. कामगारांचे आरोग्य ज्याला ऑक्युपेशन हेल्थ म्हणतात आणि सेफ्टी यांच्याबद्दल आम्ही काय काळजी घेतलेली आहे याच्याबद्दलची उपाययोजना येईल तसेच या कंपनीने राबविलेले सामाजिक उपक्रम या कंपनीने बरेच काही चालविलेले आहेत. त्यांच्याबद्दलची काही माहिती आपण देवू आणि या प्रकल्पाचा लाभ कोणाला कसा होणार आहे याची आपण माहिती दिलेली आहे. याच्यामध्ये ही एक जाहिरात दिली गेलेली होती. त्याच्यामध्ये एक महिन्यापूर्वी त्याच्यामध्ये आम्ही पर्यावरणविषयी आपण जी जनसुनावणी करणार होतो. त्याच्याबद्दलची आणि त्यांच्यानंतर ही जी कंपनी आहे ही पूर्वी बाकीचे पण केमिकल बनवायची त्यात फार्मास्टीकल म्हणजे त्याच्यामध्ये औषधांसाठी लागणारी जी केमिकल्स असतात त्याची भर पडणार आहे. कंपनीमध्ये अनुभवी माणसे कार्यरत आहे. उदा. गाजरे साहेब, म्हस्के साहेब इ. कंपनीमध्ये इंटरमिजीएटसचे व मेडीसिनचे उत्पादन करणार आहेत. औषध कंपन्यांसाठी काम करण्याची आता म्हणजे प्रॉडक्टस् तयार करणार आहेत याच्यामध्ये गट नं. 204, नाशिक मुंबई रोडवरती ते आहे आणि 12.85 ते 34 मे टन प्रति माह या प्रमाणे हे एक्सपानशन होतयं म्हणजे जास्त आपण बनवणार आहोत. यांच्यामध्ये त्याच्यानतर प्रकल्पाचे नांव याच्यामध्ये आपण सांगितल्याप्रमाणे 12.85 ते 22 पर्यंत आपण जाणार आहोत व आपली जी कॅपिसिटी होणार आहे ती 34 टन प्रति मास याप्रमाणे ती साधारण होणार आहे. प्रकल्प श्रेणी जी आहे ही 5 एफ ए वर्ग ए आम्ही ज्याला म्हणतो हा मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट ॲण्ड फॉरेस्ट दिल्ली मधला आहे. आणि पत्ता आपण बघितलाच आहे. संचालक हे वसंत जगताप आहेत. 3 कोटी इतका विस्तार प्रकल्पाचा खर्च आहे मुख्य उद्देश जो आहे तो म्हणजे बल्क ड्रग आणि इंटरमिडीएटस् बनवणं हा एक मुख्य उद्देश यांच्यामध्ये आहे आणि हे विस्तारीकरण

यांच्यामध्येच येत आहे. मनुष्यबळ येथे सध्या 120 कार्यरत असून 30 माणसांना विस्तारीत प्रकल्पामध्ये नोकऱ्या मिळू शकतात. यांच्यामध्ये प्रकल्पाची जागा आपण बघितली.

प्रकल्पाची जागा ही समुद्रसपाटीपासून 637 मी. उंचीवर आहे. एकुण भुखंड क्षेत्र जे आहे ते 12500 चौ. मी. चा आहे. त्याच्यामध्ये जवळजवळ 36.8 टक्के आपले ग्रीन क्षेत्रात आपण झाडं लावलेली आहेत. पाण्याची आवश्यकता 54.41 के.एल.डी. आहे. वॉटर टॅकरने पाणी येतं. एल.डी.ओ. साठी 480 लि. प्रति दिवस बॉयलर साठी इंधान म्हणून वापरतो. डी.जे. सेटची कॅपेसिर्टी 250 केव्हीए आहे. आणि एच.एस.डी.ची आवश्यकता 50 लि. प्रति तास आहे. वायु प्रदुषण नियंत्रणासाठी स्क्रबर बसविलेले आहेत. एकुण 300 के.व्ही.ए. पॉवरची आवश्यकता असून ती एम.एस.ई.डी.सी.एल. मार्फत पुरविली जाते. जवळचे गांव वाडीवऱ्हे आहे. ते दिड कि.मी.वर आहे. जवळचे नाशिक शहर 20 कि.मी. वर आहे. जवळचे रेल्वेस्टेशन नाशिक आहे. जवळचा महामार्ग एन.एच.3 हा 0.15 कि.मी. वर आहे. जवळचे विमानतळ नाशिक येथे 38.8 कि.मी. वर आहे. जवळचा पाणीसाठा म्हणजे मुकणे धरण 3 कि.मी. वर तसेच जवळचे सातपुर अग्निशमन विभाग 17.25 कि.मी. वर आहे. पर्यावरण दृष्ट्या सवंदेनशील क्षेत्र 10 कि.मी. च्या वर्तुळामध्ये नाही. अंजनेरी किल्ला 13.75 कि.मी. व त्र्यंबकेश्वर मंदिर 17 कि.मी. कोणतेही राष्ट्रीय उद्याने / वन्य जीव अभयारण्य 10 कि.मी. आतल्या क्षेत्रामध्ये नाही. 10 कि.मी. च्या आत पारले लिमिटेड, डेल्टा फेनोकेम, सिकवेन्स बॉयोटेक प्रा.लि. रेन्क्रो लि. इत्यादी प्रमुख उद्योग आहेत. भुकंपाचा झोन 3 आहे. सगळ्यांना माहिती आहे आपण आता कुठे बसलेलो आहोत. हे गुगल एक मॅप आहे. आपण इथे आता आहोत. आणि इथून हा 10 कि.मी. चा आणि 200 मी. 500 मी. चा हा पूर्ण एक मॅप आहे. आपण जो दिलेला आहे. आणि हा पूर्ण प्लॅन आहे. प्लॅन मध्ये आपण बघू शकता वेगवेगळ्या ठिकाणी युटिलिटी ब्लॉक आहेत, पार्कीग कोठे दिलेले आहे., गेट

कोठे आहे. कारखाना स्थळ व परिसराचा एक नकाशा दिला आहे त्यामंध्ये परिसर इ. स्पष्टपणे दाखविलेले आहे.

तसेच प्लँट ले-आऊटमधील विविध ठिकाणे व त्याची क्षेत्र इत्यादी बाबतची माहिती दिली. जसे मेन प्लँट बिल्डींग, रॉ मटेरियल स्टोरेज, सॉलव्हेंट स्टोरेज, फिनिशड प्रॉडक्ट स्टोरेज, बॉयलर एरिया, केमिकल, कुलिंग टॉवर, रोड, ट्रान्सफर्मर, ॲडमिनिस्ट्रेक्शन ॲण्ड लॅब, ईटीपी, हझजडस वेस्ट स्टोरज एरिया, ग्रीन एरिया, कटीन, चेंज रुम, युटीलिटी स्टोअर्स, रिशेप्शन सिक्युरिटी व टायलेट ब्लॉक पी.सी.सी. पॅनेल, डीजी रुम, पंम्प, पार्कींग शेड इ. तसेच उत्पादन तपशिल जसे प्रॉडक्ट चे नांव, सध्याची क्षमता मे.टन प्रति माह, प्रस्तावित क्षमता मे.टन प्रति माह, एकूण क्षमता मे.टन प्रति माह कच्चा मालाच्या आवश्यकतेबाबत त्यांनी पुढीलप्रमाणे प्रॉडक्ट, बायप्रॉडक्ट जसे ॲसिटीक ॲसिड, डी.ए.पी., इ. व त्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची मासिक आवश्यकता व ते कुठून उपलब्ध होतील व ते कसे साठविले जातील याबाबत विस्तृत माहिती दिली.

उदाहरणार्थ टीएमएपी ट्राइमीथाईल ऑर्थो प्रोपायोनेट उत्पादन प्रक्रियेची माहिती त्यांनी प्रक्रिया प्रवाह चित्र व तक्त्यात योग्य प्रकारे दिले आहे. सविस्तरपणे पाण्याचे तपशिल जसे एकुण पाण्याची आवश्यकता 54.41 के.एल.डी. फ्रेश वॉटर 37.72 के.एल.डी. + Recycle Water 16.49 KLD, 44.26 KLD for industrial use, 4.02 KLD Gardening & 6.13 KLD for Domestic use.

विद्यमान ETP जसे Oil & Grease seperature, Neutralization, Fenton, Ozonation, Electro-Coagulation, Settling, Bio Reactor, Sludge drying bed, Sand & carbon filter, Aeration and Treated water tank इ. ची फोटोसह माहिती दिली.

Tertiary treatment करुन Zero liquid discharge पर्यंत प्रक्रिया केली जाते. कंपनीला एकुण विजेची आवश्यक्ता 300 KVA असून DG Back up 250 KVA चा आहे. वीजनिर्मिती आणि पाणी गरम करण्यासाठी सौर पॅनेल स्थापन केले आहेत. म्हणून प्रतिदिन 886 ते 1083 युनिटसची बचत होते. त्यामुळे साधारणत: 25 - 30 टक्के उर्जेची बचत होते.

विद्यमान युनिटमध्ये 120 लोक काम करीत आहेत आणि प्रस्तावित विस्तारीत प्रकल्पासाठी सुमारे 30 अतिरिक्त लोकांची आवश्यकता असेल. अशाप्रकारे 150 कामगारांची आवश्यकता असेल.

वायुप्रदुषण स्त्रोत आणि नियंत्रणाबाबत तक्त्यावरुन सविस्तर माहिती दिली. घातक पदार्थ हाताळणी व विल्हेवाट त्याच्या नियोजनाबाबतची सविस्तर माहिती तक्त्यासह दिली.

मुद्दे :-

**वायु प्रदुषण स्त्रोत :-** दोन बॉयलर - यासाठी पुरेश्या उंचीची चिमणी उभारलेली आहे. डी.जी.सेट पासून होणारे प्रदुषण रोखण्यासाठी डी.जी. सेटला पुरेश्या उंचीची चिमणी उभारली आहे. तसेच हवा प्रदुषण रोखण्यासाठी स्टॅकला स्क्रबर लावलेले आहे.

घातक पदार्थ कॅटेगरी क्र.५.१, २०.३, २८.१, ३५.३, ३५.४, २८.४ इत्यादींची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने CHWTSDF मार्फत लावण्यात येईल व घातक पदार्थ कॅटेगरी क्र.२८.६ व ३३.१ याचेतून आवश्यक ते घटकांचा पुनर्वापर करण्यात येईल. किंवा प्राधिकृत एजन्सीला पुढील आवश्यक त्या प्रक्रियेसाठी देण्यात येईल.

घातक नसलेल्या कचऱ्याची हाताळणी आणि नियोजनाबाबतची माहिती तक्त्यासह दिलेली आहे. जसे MS, HDPE, Fiber Drums, Plastic Bags, Wooden, Metals, Plastic waste, Paper Scrap etc. याची विल्हेवाट Local Scrap Dealer मार्फत करण्यात येईल.

प्रकल्पात 448.826 Cubic meter Rain water harvesting प्रस्तावित आहे. हवामापन निरिक्षण माहे जानेवारी 2017, फेब्रुवारी 2017, मार्च 2017 महिन्यात केल्याचे तक्त्यात नमुद केले आहे. कमाल तपमान मार्च 2017 मध्ये 33.29$^0$C आणि किमान तापमान जानेवारीत 10.03$^0$C इतके नमुद केले.

प्रकल्प स्थळापासून 10 कि.मी. वर्तुळ क्षेत्रात जमिनीचा वापर विविध कामांसाठी कसा केला आहे याची सविस्तर माहिती तक्त्यामध्ये सादर केली.

10 कि.मी. वर्तुळ ठिकाणी 1 जानेवारी 17 ते 31 मार्च 2017 या कालावधीत हवामापन निरिक्षण करण्यात आले त्याची माहिती तक्त्यामध्ये देण्यात आली. तसेच Ambient Air Quality Monitoring आठ ठिकाणी $PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$, $NO_X$, $CO_2$ इत्यादी पॅरामीटर्ससाठी करण्यात आले आणि सर्व रिझल्टस विहीत मर्यादेत आहेत.

जमिनीतील पाण्याचे व भुपृष्ठावरील पाण्याचे 10 कि.मी. त्रिज्येच्या वर्तुळातील आठ ठिकाणांहून नमुने गोळा करण्यात आले आहेत व पृथकरण अहवाल विहीत मर्यादेत असल्याचे तक्त्यासह दाखविण्यात आले.

10 कि.मी. त्रिज्येच्या परिघातील आठ वेगवेगळ्या ठिकाणी ध्वनीच्या पातळीचे निरिक्षण करण्यात आले. दिवसा ध्वनीची पातळी 47.8 dB (A) तर रात्रीच्या वेळेस 38.6 dB (A) दिसून आली.

सामाजिक आर्थिक माहिती तक्त्यामध्ये देण्यात आली. ज्यात 33 गावाच्या क्षेत्रांचा समावेश आहे. एकुण लोकसंख्या 60847 व लिंग गुणोत्तर 934.43 आहे. साक्षरतेची टक्केवारी 71.31 आहे. साधारणतः शेतीविषयक मजूरी, नोकरी, व्यवसाय केले जातात. मुलभूत सुविधा जसे शाळा, आरोग्य केंद्रे, पोस्ट ऑफिस, मार्केट इत्यादींचा समावेश आहे.

अभ्यास क्षेत्रातील वनस्पती आणि प्राण्यांची तपशिलवार माहिती देण्यात आली. संभावित पर्यावरण परिणाम व उपाययोजना संबंधीची माहितीही तक्त्यासह देण्यात आली.

त्यात पर्यावरण घटकांमुळे संभाव्य प्रभाव, संभाव्य स्त्रोत, आणि डिझाईनद्वारे नियंत्रण, प्रभाव मुल्यमापन इ. बाबतची माहिती देण्यात आली.

पाण्याचे शुध्दीकरण करण्यासाठी आवश्यक त्या क्षमतेची एस.टी.पी. व इ.टी.पी. उभारण्यात आलेल्या असून प्रकल्पाच्या विस्तारणास अनुसरुन आवश्यक त्या क्षमतेची प्रदुषण नियंत्रण सयंत्रणा तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे उभारण्यात येईल.

हरित क्षेत्राचा तपशिल तक्त्यासह देण्यात आला. साधारणतः हरितक्षेत्र 4600 चौ.मी. असून विविध प्रकारची 387 वृक्ष सध्या कंपनी परिसरात लावण्यात आलेली आहेत. त्यांची छायाचित्रेही दाखविण्यात आली.

व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा बाबींची माहिती तक्त्यासह नमुद करण्यात आली. त्यात पुढील मुद्यांचा समावेश केला आहे.

१) व्यावसायिक आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरणाच्या दृष्टीने कंपनी सर्व व्यावसायिक कार्य लागू असलेले कायदे, नियम आणि मानकांचे पालन सुनिश्चितपणे करेल.

२) अग्निशमन करण्यासाठी अग्नि प्रतिबंधक प्रणाली आगाऊ तयार केली जाईल.

३) अग्नि सुरक्षा प्रणाली देण्यात, पोर्टेबल अग्निशामक देण्यात आले आहे.

४) आवश्यक त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना ईयरप्लग किंवा ईयरमफ इ.वैयक्तिक सुरक्षा उपकरणे देण्यात आलेली आहे.

५) कामगार व कर्मचाऱ्यांसाठी अर्धवार्षिक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य प्रशिक्षण चालविण्यात येते.

६) जेथे शक्य असेल तेथे पर्यवेक्षण केले जाते आणि पर्यवेक्षण माहिती राखून ठेवण्यात येते.

७) अनावरण मुल्यांकन प्रक्रियेच्या माध्यमातून पर्यवेक्षकांसोबत कार्य केले जाते आणि विभागाला / पर्यवेक्षकांना पर्यवेक्षणाची अनुसूची देण्यात येते.

८) ई.एच.ॲण्ड एस.ची व्यावहारिक स्वच्छता उपकरणे रोखुन ठेवण्यात येतात आणि अनावरण मुल्यांकन आराखडा देखील अद्ययावत ठेवण्यात येतील.

प्रस्तावित संरक्षण उपायायोजनांची माहिती तक्त्यात खालील मुद्यांसह दाखविण्यात आली.

१) स्टोरेज टॅक्स, उपकरणे व अन्य हार्डवेअर यांच्या रचना, बांधकाम आणि परिक्षण करतांना आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय अभियांत्रिकी मानकांचे पालन करण्यात येईल.

२) विद्युत उपकरणे योग्य रितीने अर्थ केली जातील व त्यांवर लॉक आऊट / टॅग आऊट वापरले जातील. आवश्यक त्या ठिकाणी विद्युत पृथकत्व विकसित करण्यात आणि प्रदर्शित करण्यात येईल.

३) कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी नियमित कालावधीनंतर सर्व कर्मचाऱ्यांनंतर योग्य प्रशिक्षण देण्यात येईल.

४) आवश्यक त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना ईयरप्लग किंवा ईयरमफ, पादत्राणे, हातमोजे इ. वैयक्तिक सुरक्षा उपकरणे देण्यात येतील.

५) टॅंक फार्म क्षेत्रापासून ते नियंत्रण कक्षापर्यंत चांगली संपर्क यंत्रणा उपलब्ध असेल व ती ज्वलनापासून सुरक्षित असेल.

६) अपघात किंवा आपातकालिन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याची माहिती त्वरित कळविण्यासाठी दूरध्वनी देण्यात येतील व ते सर्वांना मुक्तपणे व सुलभपणे उपलब्ध असतील. आपातकालिन दुरध्वनी क्रमांकांमध्ये अग्निशमन विभाग, रुग्णवाहिका सेवा, आपतकालिन प्रतिसाद टीम, रुग्णालय आणि पोलिस प्राधिकरण यांचे दुरध्वनी क्रमांक समाविष्ट असतील.

सी.एस.आर. उपक्रमांतर्गत सद्यस्थितीत खालील उपक्रम राबविण्यात येत असल्याचे तक्तामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केले.

व्हीएससीएल लोकांची प्रगती, प्रगतीसोबत विकास आणि काळजी यावर विश्वास ठेवते. यासाठी व्हीएससीएल ने विविध सीएसआर उपक्रम हाती घेतले आहेत ज्यात खालील बाबींचा समावेश आहे.

१) इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर येथील गरजु ग्रामस्थांना घोगड्यांचे वितरण केले.

२) वाडीवऱ्हे गावातील ग्रामपंचायतीच्या शाळेत वैद्यकिय शिबिर आयोजित करण्यात आले.

३) वाडीवऱ्हे गावातील ग्रामपंचायतीच्या शाळेभोवती कुंपणाची भिंत बांधून देण्यात आली.

४) शाळेच्या मुलांसाठी वैद्यकिय तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

५) नाशिक येथील कुंभमेळ्यात पाण्याच्या टाक्या आणि कचराकुंड्या देण्यात आल्या होत्या.

६) महामार्ग ते वाडीवऱ्हे गावाच्या दरम्यान असलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वृक्षारोपण करण्यात आले आहे.

७) मा.जिल्हाधिकारी नाशिक यांनी सुचविलेल्या शासनाच्या जलसंधारण योजनेत सक्रीय सहभाग नोंदविण्यासाठी व कार्यपारपाडणेसाठी सिन्नर येथील भोकणी गावातील पाझर तलावातील ५०० डंपर गाळ काढण्यात येवून सदर पाझर तलावाची साठवण क्षमतेत वाढ झाली व परिसरात पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढली आहे.

८) मा.जिल्हाधिकारी नाशिक यांनी सुचविलेल्या भोकणी ता.सिन्नर येथील १२० मी. बाय १६ मी. नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करुन नाल्याची साठवण क्षमतेत वाढ झाली आहे.

सी.एस.आर. उपक्रमांतर्गत भविष्यात खालील उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित असल्याचे तक्तामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केले.

१) वाडीवऱ्हे गावात हायमास्ट दिवे बसविणे.

२) जवळपासच्या शाळांना अभ्यासेत्तर उपक्रम चालविण्यासाठी आर्थिक निधी देणे.

३) जवळपास असलेल्या रस्त्यांच्या दोन्ही बाजूला वृक्षांची लागवड व देखभाल करणे.

४) गरीब विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या-पुस्तके आणि शिष्यवृत्या देणे.

५) जवळपासच्या गावांमध्ये वैद्यकिय शिबिरे व नेत्रचिकित्सा शिबिरांचे नियमित आयोजन करणे, विनामुल्य उपचार व विनामुल्य औषधे पुरविणे आणि स्वच्छता व चांगल्या आरोग्यांच्या पैलुंना ठळकपणे दर्शविणे.

६) सदर सुनावणीचे सन्माननीय अध्यक्ष यांच्या सुचनेस् अनुसरुन शासनाचे बेटी बचाव - बेटी पढाव हे अभियान वाडीवऱ्हे पंचक्रोशीत मोठया प्रमाणावर राबविण्याचा कंपनीचा संकल्प आहे.

७) शासनाच्या जलसंधारण योजनेस अनुसरुन जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली भविष्यात पाझर तलावातील गाळ काढणे, नैसर्गिक नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण बाबतचे उपक्रम राबवुन पाण्याच्या साठवण क्षमतेत वाढ करण्याचा कंपनीचा संकल्प आहे.

इन्व्हायरमेंट मोनेटरींग प्रोग्रॅम साठी भांडवली खर्च रु. 153 लाख व दरवर्षी रु. 49.75 लाख खर्चाची तरतुद केली असल्याचे तक्तात नमुद केले आहे.

सदर प्रकल्पापासून पुढीलप्रमाणे लाभ होणार असल्याचे तक्यात नमुद केले आहे.

१) प्रस्तावित विस्तार हा विद्यमान जागेतच केला जाणार आहे आणि त्याकरिता अतिरिक्त जमीन खरेदी करावी लागणार नाही.

२) प्रस्तुत प्रकल्पामुळे भारताच्या बल्क ड्रग आणि इंटरमिडीएटस् पुरवठ्या करण्याच्या क्षमतेत वाढ होईल आणि भारताची जागतिक बाजारातील स्थिती अग्रगण्य होईल व भारताच्या अर्थकारणास मजबूती मिळेल.

३) लोकांचा निरंतर प्रवासाकरिता स्थानिक वाहतुक प्रणाली उदा. ऑटो, टॅक्सी, इ. सेवा आवश्यक आहेत. ज्यामुळे अर्थकारणात वाढच होईल.

४) पर्यावरण अनुकूलतेसाठी हरितपट्टा राखुन ठेवण्यात येईल.

५) कार्यचालनाच्या काळात प्रस्तावित प्रकल्पात गैरतंत्रज्ञांनी व तंत्रज्ञानी व्यक्तींचे मोठे कार्यबल आवश्यक आहे.

६) या प्रस्तावातून इतर पुरक व्यवसाय उदा. कार्यशाळा, मार्केटींग, दुरुस्ती व देखभाल केंद्रे इ. निर्माण होतील ज्यामुळे अर्थकारणावर मोठा प्रभाव पडेल.

सदर सुनावणीचे अध्यक्ष तथा मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी नाशिक श्री. दिलीप स्वामी साहेब, यांनी प्रस्ताविकपर पुढीलप्रमाणे मार्गदर्शन केले.

वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लि. चे सर्व अधिकारी, म.प्र.नि.मंडळाचे पाटील साहेब, कुडे आणि उपस्थित सर्व बंधु-भगिनींनो आताच आपणाला सादरीकरणाच्या माध्यमातून जोशी साहेबांनी या ज्या वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लि. या कंपनीचे जे प्रस्तावित एक्सपाशन चे जे काम आहे. ते म्हणजे सुरुवातीला त्यांनी सांगितल्याप्रमाणे 12.85 MT / month एवढे उत्पादन होते. ते वाढवून आत 34.868 MT / month म्हणजे जवळ जवळ 22 MT / month एवढी वाढ त्यांना करावयाची आहे. आणि ही वाढ करत असतांना केंद्र शासन आणि राज्यशासनाची अशी वेगवेगळया कायद्यातंर्गत नियमांच्या अंतर्गत एक जनसुनावणी त्या परिसरातल्या गावकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये व्हावी असे बंधनकारक असल्यामुळे म्हणून आज आपण या ठिकाणी जनसुनावणी ठेवलेली आहे. म्हणून वाडीवऱ्हे गांव आणि या परिसरातील आपले जे गांवकरी या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांचे मी या सुनावणीचा अध्यक्ष या नात्याने मन:पूर्वक स्वागत करतो आणि आता आपण सादरीकरणामध्ये विस्ताराने जोशी साहेबांनी ज्या गोष्टी सांगितल्या त्या ऐकलेल्या आहेत. जवळ जवळ 3 कोटी रुपये खर्च करुन आता हा जो प्रस्तावित त्यांचा एक्सपाशन काम आहे त्यामध्ये तीस एक लोकांना स्थानिक नोकऱ्या त्यांनी प्रस्तावित केलेल्या आहेत. आणि जे अभ्यास त्यांनी केलेला आहे की परिसरामध्ये प्रदुषणासंबंधी सद्यस्थितीत व प्रकल्पामुळे होणारी वाढ या सर्व अभ्यासाचं निष्कर्ष काय आहे ते सादर करत असतांनाच त्या कंपनीनं पर्यावरण रक्षणासाठी काय काय केलं आहे हे सुध्दा त्यांनी आपल्या सादरीकरणात सांगितले आहे. आणि शेवटी जो CSR चा ॲटम त्यांनी जो सांगितला जो की कंपनीच्या जो कंपनीला फायदा होणार असतो तो काही समाजपयोगी कामे करण्याचं बंधन कंपनीवर आहे. त्याचं सुध्दा त्यांनी काय काय काम केल आहे आणि भविष्यात त्यांना काय काम करावयाचे आहे, मला वाटत आतापर्यंत 27 एक लाख रु. पर्यंतची कामं त्यांनी केलेली आहेत. तरी त्याच्या अनुषंगाने मला वाटत काही मेलपण आलेत. तर काही NGO असतील किंवा व्यक्ती असतील मला वाटतं जोशी साहेबां काही मेल आलेयत ना ? दोन मेल आलेले आहेत. त्याचं

वाचन या ठिकाणी केले जाईल. परंतु आपल्याला काही याच्याबद्दल काही suggestions असतील किंवा काही आपल्या शंका असतील तर ते अतिशय अभ्यासू मंडळी या ठिकाणी आहे. कंपनीचे त्यांचे consultant माझ्या उजव्या बाजूला बसलेले जे पाटील साहेब आहेत ते म.प्र.नि.मंडळाचे Regional Manager आहेत. अतिशय अभ्यासू कुडे साहेब आणि ते या क्षेत्रात खूप दिवसापासून काम करतात आणि कंपनीचे सुध्दा आता सादरीकरणात आणि मी आलो तेंव्हाच सांगितल की जगताप मागच्या ३६ वर्षाचा अनुभव त्यांना या कंपनीच्या कामामध्ये आहे. आणि जे आपण औषधी घेतो, गोळ्या घेतो, ड्रग्ज घेतो त्या ड्रग्जचे Raw material तयार करण्याचे काम ही कंपनी करते. बऱ्याच ठिकाणी आता मी कित्येक वर्षापासून आम्ही वेगवेगळ्या जिल्ह्यात काम केल आहे आणि अनेक कंपन्यांच्या पब्लिक हेअरींग ला अशा पध्दतीने आम्ही जात असतो. परंतू एखाद्या गावाचे नाव कंपनीला दिल्याचे ही पहिलीच वेळ मी बघतोय. जे वाडीवऱ्हे गावाचे नाव हे, जिथं जिथं त्यांचे product जाणार आहेत, देशात असेल किंवा देशाच्या पलिकडे तिथे तिथे तुमच्या गावाचे नांव जाणार आहे. ही एक मला म्हणजे कंपनीने स्वत:च्या कुणाचं तरी नाव न देता गावचं नाव दिलयं. याच्यातून त्यांनी एक सकारात्मकता दिसून आली. पण आता जे सादरीकरणाच्या अनुषंगाने इथे जे दोन आक्षेप असतील supporting असतील किंवा काय असतील मला माहिती नाहीत, मेलवर आलले आहेत. तस आपलं काही म्हणणं असेल, कुणाचं तर या ठिकाणी त्यांनी सांगावं. म्हणजे आपल्याला ही सुनावणी संपूर्ण करता येईल.

वुटकुरी सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ व अध्यक्ष धरित्री पर्यावरण परिरक्षण संस्थां, हाऊस नं. ६-७-४१४, शिवाजीनगर, जिल्हा नालगोंडा ५०८००१, तेलंगाणा राज्य हे सदर पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीस उपस्थित होते. त्यांनी सदर प्रकल्पास अनुसरुन आपले विचार सविस्तरपणे मांडले व पुढीलप्रमाणे सदर प्रकल्पास शुभेच्छापर संदेश दिला :-

गुडमॉर्निंग, I am Environmentalist my best wishes to the Vadivarhe Speciality Chemicals Ltd. Management firstly, I congratulate the consultancy to prepare a detail report for this project.

I am the first environmentalist in India to support the Industries. My best wishes to the management of Vadivarhe Speciality Chemicals Ltd. Generally environmentalist opposes Industries, but I am whole heartedly supporting the planning to set up industries proposed expansion of project because in India approximately 40 crores of Youths are between 18 to 35 years group are awaiting for employment opportunities and also in urgent need of developement of Industries for development of Maharashtra. I am giving you few suggesions to maintain ecological balance and development of your industries. Your consultant have already conducted baseline survey in air, water, land is very good my request if there is any possibility please collect the health status of the people, 10 km. radius and crop production status in this area. And also availability of ground water easily. It is very important to do, it is a very useful to future to take care of parameter in future. I

am also requesting you that the water is not sufficient from rain hence, rain water harvesting and water storage is very important. It is sort of a consideration. Plantation - you have already completed your target but my suggestion is that, if there is no possibility in this area please take avenue plantation, village plantation outside your industry to develope greenary. Ok please consider.

Also please priority to get an employment to local employee giving employment in your industry and also my humble request to promote skill development training to unemployed youths, better skill is useful to employment chances in your industry, remaining youths to get jobs in other places. This is also please consider for skill development area, Ok !

And also my final reqeust is to form a co-ordination committee to with your company official Govt. officials and with villager to take planations to CSR budget. It is very useful and meaningful to take up demand oriened works. This is very truthful resolutions to complete with this activity a great category comes to your industry. Finally I am request you to take proper pollution control measures to control air pollution, water pollution, land pollution, noise pollution. This is my request. Once again my best wishes to support the industries development to the management. Finally I am requesting to the public hearing panel committee to recommend MOEF to give

unconditional permission to Vadivarhe Speciality Chemicals Ltd. proposed expansion of manufacturing process.

Thank you,

श्री. रेड्डी यांनी आपल्य सुचना/अभिप्राय हे ईमेलद्वारे महाराष्ट्र प्रदूषण मंडळास पाठविल्या होत्या. त्या नस्तीवर घेण्यात आल्या.

वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लिमिटेड या कंपनीचे सल्लागाराचे प्रतिनिधी श्री. प्रदीप जोशी यांनी श्री.वुटकुरी सुनंदा रेड्डी यांनी इंग्रजीतून मांडलेल्या त्याच्या विषयाचा मराठीत अनुवाद मा. अध्यक्षांच्या परवानगीने पुढीलप्रमाणे केला.

साहेबांनी जे इंग्लिशमध्ये सांगितले त्यात असं होतं की, साधारणपणे पर्यावरण वादी ही जी माणसं असतात की, त्यांना आपल्या इंडस्ट्रीज नकोत असा मी नाहीय. इंडस्ट्रीला मी सपोर्ट करतो. मला इंडस्ट्रीज पाहिजेत. पण त्यांनी काही काळजी घेतली पाहिजे. असं त्यांनी सांगितलयं त्यांच्यामध्ये त्यांचा पहिला मुद्दा असा होता की, आम्ही already दहा की मी मध्ये हवेची गुणवत्ता, पाण्याची गुणवत्ता, जमिनीची गुणवत्ता तपासलेली होती. आणि त्यांच्याप्रमाणे आम्ही पुढे त्याच्याही परिणाम काय होईल त्याचे चांगलेच परिणाम होतील हे आम्ही बघितलेले आहे. ते त्यांनी सांगितलेले होते. दुसरी गोष्ट अशी त्यांच्यामते की त्यांनी असे सांगितले की हे संगळं करत असतांना तुम्ही पर्यावरणाचं संगोपन करा म्हणजे एवढे पावसाचे पाणी येत म्हणजे आज मुंबईला सुध्दा ९७% पाणी हे नुसतं समुद्राला जातं. आणि ३% चं पाणी राहतं.हे Problem मुंबईला पण आहेत. तर त्यांनी असं सांगितलं की, पावसाच्या पाण्याचा तुम्हाला जास्तीत जास्त कसा उपयोग करता येईल आणि ते कस वाचवता येईल हे तुम्ही प्रयत्न करा. दुसरं त्यांनी असं सांगितलं की, याच्यामध्ये ग्राउण्ड वॉटर म्हणजे भूगर्भातील पाणी आहे, ती लेव्हल पण आपल्याला कशी वाढवता येईल. तर Rain water harvesting करुन दोन गोष्ट १) टाक्यामध्ये पाणी साठवणे, २) पाणी खाली मुरवणे, दोन्ही

आपण जर केलं तर या दृष्टीने या कंपनीला पुढे जावून त्याचा फायदा चांगला होईल. तिसरी गोष्ट अशी आहे की काही Skill development करावं म्हणजे आपण आता म्हणजे PM. मोदींन च्या प्रमाणे Skill Development व्हावं कारण ज्ञान आणिskill या दोन वेगवेगळ्या गोष्टी ओहत. तर त्यांच्यामधून Skill development व्हावं म्हणजे स्त्रीयांसाठी किंवा पुरुषांसाठी आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ४० कोटी मुलं अगदी यंग म्हणजे ३० शी खालची आहेत. तर त्यांना जर काम मिळाली तर त्या दृष्टीने तुम्ही त्यांना Skill development त्यांच करण्यात यावं असं त्यांनी आपल्या भाषणात मांडलं.

वाडीवऱ्हे स्पेशालिटी केमिकल्स् लिमिटेड या कंपनीचे सल्लागाराचे प्रतिनिधी श्री. प्रदीप जोशी यांनी श्री.वुटकुरी सुनंदा रेड्डी यांचे माहितीसाठी व त्यांनी उपस्थित केलेल्या मुदयांवरची माहिती अवगत व्हावी यासाठी त्यांनी इंग्रजी मधुन पुढीलप्रमाणे ठळक माहिती दिली.

Now I come to those questions. First thing is that I am very thankful to you, as you travelled so much for supporting management as such. You have travelling for and come here for honoring us and coming over here.

